


गुरूवार, दि. २२ ऑगस्ट, २०२४ कृषीवल

# सिडकोतर्फे कृष्ण जन्माष्टमीचा मुहूर्त

## ■ ९०२ सदनिकांच्या विक्रीला होणार प्रारंभ

। उरण । वार्ताहर ।

सिडको महामंडळातर्फे कृष्ण जन्माष्टमीच्या मुहूर्तावर ९०२ सदनिकांच्या गृहनिर्माण योजनेचा प्रारंभ करण्यात येणार आहे. या गृहनिर्माण योजनेंतर्गत नवी मुंबईतील कळंबोली, खारघर व घणसोली या विकसित नोडमधील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाकरिता ३८ व सर्वसाधारण प्रवर्गाकरिता १७५ याप्रमाणे एकूण २१३ सदनिका तसेच सिडकोच्या खारघर येथील स्वप्नपूर्ती व वास्तूविहार-सेलिब्रेशन गृहसंकुलांतील मिळून एकूण ६८९ सदनिकांच्या विक्रीकरिता गृहनिर्माण योजना जाहीर करण्यात येणार आहे.

सिडकोतर्फे सातत्याने विविध उत्पन्न गटांतील नागरिकांकरिता गृहनिर्माण योजना राबविण्यात येतात. या वर्षीच्या कृष्ण जन्माष्टमीच्या मुहूर्तावर जाहीर करण्यात येणाऱ्या गृहनिर्माण योजनेद्वारे नागरिकांना सर्व पायाभूत सोयी सुविधांनी परिपूर्ण असलेल्या नवी मुंबईमध्ये आपले हक्काच्या घराचे स्वप्न साकार करण्याची संधी मिळणार आहे. या गृहसंकुलांना रेल्वे, रस्ते, मेट्रोद्वारे कनेक्टिव्हिटी लाभली आहे. सिडकोच्या नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळासह सिडकोचे अन्य महत्त्वाकांक्षी प्रकल्प या गृहसंकुलांपासून नजीकच्या अंतरावर आहेत. यामुळे नागरिकांना परिपूर्ण जीवनशैली अनुभवण्याची संधी मिळणार आहे.

CIDCO
WE MAKE CITIES

NEWS

**नवे शहर** गुरुवार, २२ ऑगस्ट २०२४

# 'सिडको'च्या 'अभय योजना'ला १५ सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ

## थकीत ४ हजार कोटी रुपये वसुलीचे 'सिडको'पुढे आव्हान




**नवी मुंबई :** भाडेपट्टा शुल्क, सेवाशुल्क आणि विकास शुल्कमध्ये ५० टक्के सवलत देण्यासंदर्भात 'सिडको'तर्फे राबवण्यात येणाऱ्या 'अभय योजना'ला अखेर शासनाने येत्या १५ सप्टेंबर पर्यंत मुदतवाढ दिली आहे. भाडेपट्टा, सेवा आणि विकास शुल्कासह मावेजा रक्कमेपोटी 'सिडको'ची ४००० कोटी रुपये रक्कम थकीत आहे. विशेष म्हणजे सदर अभय योजना नवी मुंबई प्रकल्पासह शहरे प्रकल्पांतर्गत छत्रपती संभाजीनगर, नाशिक, नांदेड आणि नागपूर येथील 'सिडको'च्या प्रकल्पांसाठी देखील नगरविकास विभागाने लागू केली आहे.

'सिडको'च्या सदर थकीत रक्कमेच्या वसुलीसाठी राज्य सरकारने थकीत रक्कमेवर ५० टक्के सवलत लागू करुन 'अभय योजना'ला ३० जूनपर्यंत मुदतवाढ दिली होती. मात्र, त्यानंतर राज्य सरकारने 'अभय योजना'ला मुदतवाढ देण्याबाबत निर्णय न घेतल्याने नवी मुंबईकर नागरिक हवालदिल झाले होते. विकासकांच्या विविध संघटनांनी आणि लोकप्रतिनिधींनी केलेल्या मागणीनंतर 'सिडको'ने लागु केलेल्या 'अभय योजना'सिडको'ला अखेर नगर विकास विभागाने १५ सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ देण्याचा निर्णय घेतला आहे. याबाबतचा

(उर्वरित पान २ वर)

### सिडकोच्या अभय योजनेला... (पान १ वरुन)

निर्णय नगरविकास विभागाने १९ ऑगस्ट रोजी जाहीर केला आहे.

'अभय योजना'ला मुदतवाढ देताना नगरविकास विभागाने येत्या १५ सप्टेंबर पर्यंत 'सिडको'ला प्राप्त होणाऱ्या अर्जावर सिडको अधिकाऱ्यांनी पुढील १५ दिवसात अर्जाची नियमोचित तपासणी करुन अर्जदारास थकीत रक्कमेचा भरणा पुढील १५ दिवसात करण्याबाबत कळविण्यास सांगितले आहे. 'सिडको'ने कळविल्यानंतर या १५ दिवसात संबंधितांनी थकीत रक्कमेचा भरणा 'सिडको'त करणे बंधनकारक राहणार आहे. तसेच अर्जावर भूखंडाचा क्रमांक नमूद केलेला असल्यासच अर्ज परिपूर्ण समजण्यात येणार असल्याचे नगरविकास विभागाने आपल्या पत्रात स्पष्ट केले आहे.

@Cidco Ltd @cidco_Ltd @cidco_Ltd @CIDCO Ltd. cidco.maharashtra.gov.in

CIDCO
WE MAKE CITIES

NEWS

मुंबई, गुरुवार, २२ ऑगस्ट २०२४ मुंबई तरुण भारत

# राज्यभरात सिडकोच्या 'अभय योजने'ला मुदतवाढ

## चार हजार कोटी रक्कम थकित

**नवी मुंबई, दि. २१ : प्रतिनिधी**

भाडेपट्टाशुल्क, सेवाशुल्क आणि विकासशुल्कामध्ये ५० टक्के सवलत देण्यासंदर्भात सिडकोद्वारा राबवण्यात येणाऱ्या 'अभय योजने'ला दि. १५ सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. ही 'अभय योजना' नवी मुंबई प्रकल्पासह शहरे प्रकल्पांतर्गत छत्रपती संभाजीनगर, नाशिक, नांदेड आणि नागपूर येथील सिडकोच्या प्रकल्पांसाठीदेखील नगरविकास विभागाने लागू केली आहे.




सिडकोच्या थकित रकमेच्या वसुलीसाठी राज्य सरकारने थकित रकमेवर ५० टक्के सवलत लागू करून 'अभय योजने'ला दि. ३० जून रोजीपर्यंत मुदतवाढ दिली होती. मात्र, त्यानंतर राज्य सरकारने 'अभय योजने'ला मुदतवाढ देण्याबाबत निर्णय न घेतल्याने नवी मुंबईकर नागरिक हवालदिल झाले होते. विकसकांच्या विविध संघटना आणि लोकप्रतिनिधींनी केलेल्या मागणीनंतर सिडकोने लागू केलेल्या 'अभय योजने'ला अखेर नगरविकास विभागाने दि. १५ सप्टेंबर रोजीपर्यंत मुदतवाढ देण्याचा निर्णय घेतला आहे. याबाबतचा निर्णय नगरविकास विभागाने दि. १९ ऑगस्ट रोजी जाहीर केला. भाडेपट्टा, सेवा व विकासशुल्कासह मावेजा रकमेपोटी सिडकोची चार हजार कोटी रुपये रक्कम थकित आहे.

### अर्जावर भूखंडाचा क्रमांक

'अभय योजने'ला मुदतवाढ देताना नगरविकास विभागाने दि. १५ सप्टेंबर रोजीपर्यंत सिडकोला प्राप्त होणाऱ्या अर्जांवर सिडको अधिकाऱ्यांनी पुढील १५ दिवसांत अर्जांची तपासणी करून अर्जदारास थकित रकमेचा भरणा पुढील १५ दिवसांत करण्याबाबत कळविण्यास सांगितले आहे. सिडकोने कळविल्यानंतर या १५ दिवसांत संबंधितांनी थकित रकमेचा भरणा सिडकोत करणे बंधनकारक राहणार आहे. तसेच, अर्जावर भूखंडाचा क्रमांक नमूद केलेला असल्यासच अर्ज परिपूर्ण समजण्यात येणार असल्याचे नगरविकास विभागाने आपल्या पत्रात स्पष्ट केले आहे. दि. १५ सप्टेंबर रोजीनंतर प्राप्त होणाऱ्या अर्जांचा 'अभय योजने'अंतर्गत विचार केला जाणार नाही, असेही सिडकोने स्पष्ट केले आहे.

@Cidco Ltd @cidco_Ltd @cidco_Ltd @CIDCO Ltd. cidco.maharashtra.gov.in

CIDCO
WE MAKE CITIES

NEWS

प्रहार मुंबई | गुरुवार, २२ ऑगस्ट २०२४

# सिडकोच्या अभय योजनेस १५ सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ

◆ मुंबई (प्रतिनिधी) :

नवी मुंबईतील सिडकोच्या भूखंडांवर बांधकाम मुदतवाढीकरिता देय असलेल्या अतिरिक्त भाडेपट्टा शुल्क वसुलीबाबत राबविण्यात आलेल्या अभय योजनेस महाराष्ट्र शासनाच्या निर्णयानुसार १५ सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. नवी मुंबई व परिसरातील सिडकोने भाडेपट्ट्याने वितरीत केलेल्या जमिनींच्या विकासनाच्या अनुषंगाने बांधकाम व्यवसायाशी संबंधित अडचणी लक्षात घेता महाराष्ट्र शासनाने १२ जानेवारी २०२४ रोजीच्या आदेशान्वये सिडकोने बांधकाम मुदतवाढीकरिता देय असलेल्या अतिरिक्त भाडेपट्टा शुल्क वसुलीबाबत अभय योजना राबविण्यास तसेच इतर लोकाभिमुख धोरणात्मक निर्णय घेऊन मान्यता दिली होती. सदर अभय योजनेस महाराष्ट्र शासनाने १५ सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ जाहीर केली आहे.

सदर अभय योजनेस देण्यात आलेल्या मुदतवाढीनुसार, नवी मुंबई क्षेत्र तसेच नवीन शहरे प्रकल्पांतर्गत छत्रपती संभाजीनगर, नाशिक, नांदेड व नागपूर येथील सिडकोच्या प्रकल्पांसाठी अतिरिक्त भाडेपट्टा शुल्क




तसेच सेवा शुल्क व विकास शुल्कमध्ये ५०% सवलत देण्यासंदर्भात राबविण्यात येणाऱ्या अभय योजनेंतर्गत अर्जदारास अर्ज करण्याकरिता १५ सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. अभय योजनेंतर्गत प्राप्त होणाऱ्या अर्ज/निवेदनांवर प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून पुढील १५ दिवसांत नियमोचित तपासणी करून, सिडकोमार्फत संबंधितांना रकमेचा भरणा करणेबाबत कळविण्यात येईल. सिडकोकडून याबाबत कळविण्यात आल्यानंतर पुढील १५ दिवसांच्या आत अर्जदाराने रकमेचा भरणा करणे आवश्यक असणार आहे. ज्या अर्जांवर भूखंडाचा क्रमांक नमूद केलेला असेल तेच अर्ज परिपूर्ण समजण्यात येतील. १५ सप्टेंबरनंतर प्राप्त होणाऱ्या अर्जांचा अभय योजने अंतर्गत विचार केला जाणार नाही, याची कृपया अर्जदारांतर्फे नोंद घेण्यात यावी, असे सिडकोकडून सांगण्यात आले आहे.

@Cidco Ltd @cidco_Ltd @cidco_Ltd @CIDCO Ltd. cidco.maharashtra.gov.in




सकाळ मुंबई, गुरुवार, २२ ऑगस्ट २०२४

# अभय योजनेला १५ सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ

नवी मुंबई, ता. २१ (वार्ताहर) : भाडेपट्टा शुल्क, सेवाशुल्क व विकास शुल्कामध्ये ५० टक्के सवलत देण्यासंदर्भात सिडकोद्वारा राबवण्यात येणाऱ्या अभय योजनेला १५ सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

भाडेपट्टा, सेवा व विकास शुल्कासह मावेजा रकमेपोटी सिडकोची ४,००० कोटी रुपये रक्कम थकीत आहे. विशेष म्हणजे, ही अभय योजना नवी मुंबई प्रकल्पासह शहरे प्रकल्पांतर्गत छत्रपती संभाजीनगर, नाशिक, नांदेड व नागपूर येथील सिडकोच्या प्रकल्पांसाठीदेखील नगरविकास विभागाने लागू केली आहे. सिडकोच्या थकीत रकमेच्या वसुलीसाठी राज्य सरकारने थकीत रकमेवर ५० टक्के सवलत लागू करून अभय योजनेला ३० जूनपर्यंत मुदतवाढ दिली होती; मात्र त्यानंतर राज्य सरकारने अभय योजनेला मुदतवाढ देण्याबाबत निर्णय न घेतल्याने नवी मुंबईकर नागरिक हवालदिल झाले होते.

विकसकांच्या विविध संघटनांनी व लोकप्रतिनिधींनी केलेल्या मागणीनंतर सिडकोने लागू केलेल्या अभय योजनेला अखेर नगरविकास विभागाने १५ सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ देण्याचा निर्णय घेतला आहे. याबाबतचा निर्णय नगरविकास विभागाने १९ ऑगस्टला जाहीर केला. ही योजना नवी मुंबई प्रकल्पासह शहरे प्रकल्पांतर्गत छत्रपती संभाजीनगर, नाशिक, नांदेड व नागपूर येथील प्रकल्पांसाठीदेखील लागू केली आहे.

## अर्जावर भूखंडाचा क्रमांक

अभय योजनेला मुदतवाढ देताना नगरविकास विभागाने येत्या १५ सप्टेंबरपर्यंत सिडकोला प्राप्त होणाऱ्या अर्जावर सिडको अधिकाऱ्यांनी पुढील पंधरा दिवसांत अर्जाची नियमोचित तपासणी करून अर्जदारास थकीत रकमेचा भरणा पुढील पंधरा दिवसांत करण्याबाबत कळविण्यास सांगितले आहे. सिडकोने कळविल्यानंतर या पंधरा दिवसांत संबंधितांनी थकीत रकमेचा भरणा सिडकोत करणे बंधनकारक राहणार आहे. तसेच, अर्जावर भूखंडाचा क्रमांक नमूद केलेला असल्यासच अर्ज परिपूर्ण समजण्यात येणार असल्याचे नगरविकास विभागाने आपल्या पत्रात स्पष्ट केले आहे.

CIDCO
WE MAKE CITIES

NEWS

लोकसत्ता
WWW.LOKSATTA.COM
★ मुंबई, गुरुवार,
२२ ऑगस्ट २०२४

# सिडकोच्या अभय योजनेस मुदतवाढ

लोकसत्ता प्रतिनिधी

**पनवेल** : राज्य सरकारने सिडकोच्या अतिरिक्त भाडेपट्टा शुल्क, सेवा शुल्क व विकास शुल्क भरण्यासंबंधीच्या अभय योजनेस १५ सप्टेंबरपर्यंतची मुदतवाढ दिली आहे.

नवी मुंबई व परिसरातील सिडकोने भाडेपट्ट्याने वितरीत केलेल्या जमिनींच्या विकासनाच्या अनुषंगाने बांधकाम व्यवसायाशी संबंधित अडचणी लक्षात घेता सरकारने १२ जानेवारीला आदेश काढून सिडकोने बांधकाम मुदतवाढीकरिता देय असलेल्या अतिरिक्त भाडेपट्टा शुल्क वसुलीबाबत अभय योजना राबविण्यास तसेच इतर लोकाभिमुख धोरणात्मक निर्णय घेऊन मान्यता दिली होती. याच अभय योजनेस पुन्हा मुदतवाढ दिली आहे.

या अभय योजनेमध्ये नवी मुंबई क्षेत्र, नवीन शहरे प्रकल्पांतर्गत छत्रपती संभाजीनगर, नाशिक, नांदेड व नागपूर येथील सिडकोच्या प्रकल्पांसाठी अतिरिक्त भाडेपट्टा शुल्क तसेच सेवा शुल्क आणि विकास शुल्कामध्ये ५० टक्के सवलत (पान ३ वर)

# सिडकोच्या अभय योजनेस मुदतवाढ

(पान १ वरून) देण्यासंदर्भात राबविण्यात येणाऱ्या अभय योजनेंतर्गत अर्जदारास १५ सप्टेंबरपर्यंत अर्ज करता येतील. या अभय योजनेंतर्गत सिडकोकडे प्राप्त होणाऱ्या अर्जांच्या तारखेपासून पुढील १५ दिवसांत नियमोचित तपासणी करून, सिडकोमार्फत संबंधितांना रकमेचा भरणा करणेबाबत कळविण्यात येईल. सिडकोकडून याबाबत कळविण्यात आल्यानंतर पुढील १५ दिवसांच्या आत अर्जदाराने सुद्धा रकमेचा भरणा करणे बंधणकारक राहील. ज्या अर्जावर भूखंडाचा क्रमांक नमूद केलेला असेल तेच अर्ज परिपूर्ण समजण्यात येतील. तसेच १५ सप्टेंबरनंतर प्राप्त होणाऱ्या अर्जांचा अभय योजने अंतर्गत विचार केला जाणार नाही, याची बांधकाम व्यावसायिकांनी नोंद घेण्याचे आवाहन सिडकोच्या जनसंपर्क विभागाने केले आहे.

CIDCO
WE MAKE CITIES

NEWS

Newsband Thursday, 22 August 2024

# CIDCO to launch housing scheme for 902 flats on August 27, 2024 to mark Krishna Janmashtami

By Chandrashekhar Hendve

**Navi Mumbai:** On the auspicious occasion of Krishna Janmashtami, CIDCO is set to launch a new housing scheme on August 27, 2024, offering a total of 902 flats. This scheme will include 38 tenements for the economically weaker section and 175 for the general category, located in the developed nodes of Kalamboli, Kharghar, and Ghansoli in Navi Mumbai. Additionally, 689 tenements from CIDCO's 'Swapnapurti' and 'Vastuvihar-Celebration' projects at Kharghar will also be available under this scheme.

CIDCO has consistently implemented housing schemes catering to various income groups, and this latest initiative provides citizens an opportunity to fulfill their dream of owning a home in Navi Mumbai, a city known for its excellent infrastructure. These housing complexes are well-connected by rail, road, and metro, with CIDCO's ambitious projects like the Navi Mumbai International Airport in close proximity.



@Cidco Ltd @cidco_Ltd @cidco_Ltd @CIDCO Ltd. cidco.maharashtra.gov.in



THE INDIAN EXPRESS, THURSDAY, AUGUST 22, 2024

# CIDCO to launch scheme for sale of 902 flats on Janmashtami

*Mumbai:* CIDCO will launch a housing scheme for sale of 902 flats on August 27, on the occasion of Krishna Janmashtami.

Under the housing scheme while 38 tenements for the economically weaker section and 175 for the general category will be launched in Kalamboli, Kharghar and Ghansoli in Navi Mumbai; 689 tenements from CIDCO's 'Swapnapurti' and 'Vastuvihar-Celebration' at Kharghar, will be included in the scheme. **ENS**




mid-day Thursday, August 22, 2024 | Mumbai

A MEDIA MARKETING INITIATIVE

# CIDCO to launch a housing scheme

## CIDCO will launch a housing scheme on Janmashtami, offering 902 flats for sale

CIDCO is set to launch a housing scheme on the occasion of Krishna Janmashtami. The housing scheme of total 902 flats will be launched on 27th August 2024. Under this housing scheme, 38 tenements for the economically weaker section and 175 for the general category in the developed nodes of Kalamboli, Kharghar and Ghansoli in Navi Mumbai and 689 tenements from CIDCO's 'Swapnapurti' and 'Vastuvihar-Celebration' at Kharghar' will be included in this scheme.

CIDCO has been implementing housing schemes for citizens of various income groups. Under this newly launched scheme on Janmashtmi, citizens will get an opportunity to realize their dream of owning a house in Navi Mumbai, having one of the best infrastructure facilities.

These housing complexes have connectivity through rail, road and metro. CIDCO's other ambitious projects like Navi Mumbai International Airport are within close proximity of these housing complexes. This will give citizens an opportunity to experience a perfect lifestyle.

@Cidco Ltd @cidco_Ltd @cidco_Ltd @CIDCO Ltd. cidco.maharashtra.gov.in




**नवराष्ट्र** | मुंबई, २२ ऑगस्ट २०२४

# जन्माष्टमीला सिडकोच्या सदनिका विक्रीसाठी

## ९०२ सदनिकांच्या गृहनिर्माण योजनेचा प्रारंभ

नवी मुंबई, (वा.) सिडको महामंडळातर्फे कृष्ण जन्माष्टमीच्या मुहूर्तावर मंगळवार, दि. २७ ऑगस्ट २०२४ रोजी एकूण ९०२ सदनिकांच्या गृहनिर्माण योजनेचा प्रारंभ करण्यात येणार आहे. या गृहनिर्माण योजनेंतर्गत नवी मुंबईतील कळंबोली, खारघर व घणसोली या विकसित नोडमधील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाकरिता ३८ व सर्वसाधारण प्रवर्गाकरिता १७५ याप्रमाणे एकूण २१३ सदनिका तसेच सिडकोच्या खारघर येथील स्वप्नपूर्ती व वास्तूविहार-सेलिब्रेशन गृहसंकुलांतील मिळून एकूण ६८९ सदनिकांच्या विक्रीकरिता गृहनिर्माण योजना जाहीर करण्यात येणार आहे.

सिडकोतर्फे सातत्याने विविध उत्पन्न गटांतील नागरिकांकरिता गृहनिर्माण योजना राबविण्यात येतात. या वर्षीच्या कृष्ण जन्माष्टमीच्या मुहूर्तावर जाहीर करण्यात येणाऱ्या गृहनिर्माण योजनेद्वारे नागरिकांना सर्व पायाभूत सोयी सुविधांनी परिपूर्ण असलेल्या नवी मुंबईमध्ये आपले हक्काच्या घराचे स्वप्न साकार करण्याची संधी मिळणार आहे.

### परिपूर्ण जीवनशैली

या गृहसंकुलांना रेल्वे, रस्ते, मेट्रो द्वारे कनेक्टिव्हिटी लाभली आहे. सिडकोच्या नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळासह सिडकोचे अन्य महत्त्वाकांक्षी प्रकल्प या गृहसंकुलांपासून नजीकच्या अंतरावर आहेत. यामुळे नागरिकांना परिपूर्ण जीवनशैली अनुभवण्याची संधी मिळणार आहे.


@Cidco Ltd @cidco_Ltd @cidco_Ltd @CIDCO Ltd. cidco.maharashtra.gov.in




मराठी दैनिक
प्रातःकाल
मुंबई, गुरुवार दि. २२ ऑगस्ट २०२४

# कृष्ण जन्माष्टमीच्या मुहूर्तावर सिडको लॉटरीचा शुभारंभ

पनवेल, दि. २१ (वार्ताहर) : सिडको महामंडळातर्फे कृष्ण जन्माष्टमीच्या मुहूर्तावर मंगळवार, दि.२७७ ऑगस्ट २०२४ रोजी एकूण ९०२ सदनिकांच्या गृहनिर्माण योजनेचा प्रारंभ करण्यात येणार आहे. या गृहनिर्माण योजनेंतर्गत नवी मुंबईतील कळंबोली, खारघर व घणसोली या विकसित नोडमधील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाकरिता ३८ व सर्वसाधारण प्रवर्गाकरिता १७५ याप्रमाणे एकूण २१३ सदनिका तसेच सिडकोच्या खारघर येथील स्वप्नपूर्ती व वास्तूविहार-सेलिब्रेशन गृहसंकुलांतील मिळून एकूण ६८९ सदनिकांच्या विक्रीकरिता गृहनिर्माण योजना जाहीर करण्यात येणार आहे. सिडकोतर्फे सातत्याने विविध उत्पन्न गटांतील नागरिकांकरिता गृहनिर्माण योजना राबविण्यात येतात. या वर्षीच्या कृष्ण जन्माष्टमीच्या मुहूर्तावर जाहीर करण्यात येणाऱ्या गृहनिर्माण योजनेद्वारे नागरिकांना सर्व पायाभूत सोयी सुविधांनी परिपूर्ण असलेल्या नवी मुंबईमध्ये आपले हक्काच्या घराचे स्वप्न साकार करण्याची संधी मिळणार आहे.

@Cidco Ltd @cidco_Ltd @cidco_Ltd @CIDCO Ltd. cidco.maharashtra.gov.in




मुंबई तरुण भारत मुंबई, गुरुवार, २२ ऑगस्ट २०२४

# सिडकोच्या ९०२ सदनिकांसाठी योजनेला प्रारंभ

## कृष्ण जन्माष्टमीच्या मुहूर्तावर होणार घोषणा

**मुंबई, दि. २१ : प्रतिनिधी**

सिडकोतर्फे सातत्याने विविध उत्पन्न गटांतील नागरिकांकरिता गृहनिर्माण योजना राबविण्यात येतात. सोडतीद्वारे या गृहनिर्माण योजनेतील घरांची विक्री होते. हे पाहता यंदाच्यावर्षी सिडकोतर्फे कृष्ण जन्माष्टमीच्या मुहूर्तावर मंगळवार, दि. २७ ऑगस्ट रोजी ९०२ सदनिकांच्या विक्रीकरिता गृहनिर्माण योजनेचा प्रारंभ करण्यात येणार असल्याची माहिती, सिडकोने दिली.

कृष्ण जन्माष्टमीच्या मुहूर्तावर जाहीर करण्यात येणाऱ्या गृहनिर्माण योजनेद्वारे नागरिकांना सर्व पायाभूत सोयी-सुविधांनी परिपूर्ण असलेल्या नवी मुंबईमध्ये आपल्या हक्काच्या घराचे स्वप्न साकार करण्याची संधी मिळणार आहे. या गृहसंकुलांना रेल्वे, रस्ते, मेट्रोद्वारे कनेक्टिव्हिटी लाभली आहे. सिडकोच्या नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळासह सिडकोचे अन्य महत्त्वाकांक्षी प्रकल्प या गृहसंकुलांपासून नजीकच्या अंतरावर आहेत. यामुळे नागरिकांना परिपूर्ण जीवनशैली अनुभवण्याची संधी मिळणार आहे. सिडको महामंडळातर्फे कृष्ण जन्माष्टमीच्या मुहूर्तावर मंगळवार, दि. २७ ऑगस्ट २०२४ रोजी एकूण ९०२ सदनिकांच्या गृहनिर्माण योजनेचा प्रारंभ करण्यात येणार आहे. या गृहनिर्माण योजनेंतर्गत नवी मुंबईतील कळंबोली, खारघर व घणसोली या विकसित नोडमधील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांकरिता ३८ व सर्वसाधारण प्रवर्गाकरिता १७५ या प्रमाणे एकूण २१३ सदनिका तसेच सिडकोच्या खारघर येथील स्वप्नपूर्ती व वास्तूविहार-सेलिब्रेशन गृहसंकुलांतील मिळून एकूण ६८९ सदनिकांच्या विक्रीकरिता गृहनिर्माण योजना जाहीर करण्यात येणार आहे.




आपलं महानगर गुरुवार २२ ऑगस्ट २०२४

# श्रीकृष्ण जन्माष्टमीच्या मुहूर्तावर सिडकोची गृह स्वप्नपूर्ती

**आपलं महानगर वृत्तसेवा**

**नवी मुंबई।** सिडको महामंडळातर्फे कृष्ण जन्माष्टमीच्या मुहूर्तावर मंगळवार २७ ऑगस्ट रोजी एकूण ९०२ सदनिकांच्या गृहनिर्माण योजनेचा प्रारंभ करण्यात येणार आहे. या गृहनिर्माण योजनेंतर्गत कळंबोली, खारघर व घणसोली या विकसित नोडमधील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाकरिता ३८ व सर्वसाधारण प्रवर्गाकरिता १७५ याप्रमाणे एकूण २१३ सदनिका तसेच सिडकोच्या खारघर येथील स्वप्नपूर्ती व वास्तूविहार-सेलिब्रेशन गृहसंकुलांतील मिळून एकूण ६८९ सदनिकांच्या विक्रीकरिता गृहनिर्माण योजना जाहीर करण्यात आली आहे.

सिडकोतर्फे सातत्याने विविध उत्पन्न गटांतील नागरिकांकरिता गृहनिर्माण योजना राबविण्यात येतात. या वर्षीच्या कृष्ण जन्माष्टमीच्या मुहूर्तावर जाहीर करण्यात येणाऱ्या गृहनिर्माण योजनेद्वारे नागरिकांना सर्व पायाभूत सोयी सुविधांनी परिपूर्ण असलेल्या नवी मुंबईमध्ये आपले हक्काच्या घराचे स्वप्न साकार करण्याची संधी मिळणार आहे.

CIDCO
WE MAKE CITIES

NEWS

**प्रहार** मुंबई | गुरुवार, २२ ऑगस्ट २०२४

# जन्माष्टमीच्या मुहूर्तावर सिडको लॉटरीचा शुभारंभ

◆ पनवेल (वार्ताहर) :

सिडको महामंडळातर्फे कृष्ण जन्माष्टमीच्या मुहूर्तावर मंगळवार, दि.२७ ऑगस्ट २०२४ रोजी एकूण ९०२ सदनिकांच्या गृहनिर्माण योजनेचा शुभारंभ करण्यात येणार आहे. या गृहनिर्माण योजनेंतर्गत नवी मुंबईतील कळंबोली, खारघर व घणसोली या विकसित नोडमधील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांकरिता ३८ व सर्वसाधारण प्रवर्गाकरिता १७५ याप्रमाणे एकूण २१३ सदनिका तसेच सिडकोच्या खारघर येथील स्वप्नपूर्ती व वास्तूविहार-सेलिब्रेशन गृहसंकुलातील मिळून एकूण ६८९ सदनिकांच्या विक्रीकरिता गृहनिर्माण योजना जाहीर करण्यात येणार आहे.

या योजनेतील सदनिका त्वरित ताबा स्वरूपात उपलब्ध असतील. सिडकोतर्फे सातत्याने विविध उत्पन्न गटांतील नागरिकांकरिता गृहनिर्माण योजना राबविण्यात येतात. या वर्षीच्या कृष्ण जन्माष्टमीच्या मुहूर्तावर जाहीर करण्यात येणाऱ्या गृहनिर्माण



योजनेद्वारे नागरिकांना सर्व पायाभूत सोयी सुविधांनी परिपूर्ण असलेल्या नवी मुंबईमध्ये आपले हक्काच्या घराचे स्वप्न साकार करण्याची संधी मिळणार आहे.

या गृहसंकुलांना रेल्वे, रस्ते, मेट्रो द्वारे कनेक्टिव्हिटी लाभली आहे. सिडकोच्या नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळासह सिडकोचे अन्य महत्त्वाकांक्षी प्रकल्प या गृहसंकुलांपासून नजीकच्या अंतरावर आहेत. यामुळे नागरिकांना परिपूर्ण जीवनशैली अनुभवण्याची संधी मिळणार आहे.

CIDCO
WE MAKE CITIES
NEWS

पुण्य नगरी
गुरुवार, २२ ऑगस्ट २०२४ । मुंबई


# कृष्णजन्माष्टमीच्या मुहूर्तावर ९०२ सदनिकांची विक्री

## खारघर व घणसोलीतील नागरिकांना संधी

**बेलापूर :** सिडकोतर्फे कृष्ण जन्माष्टमीच्या मुहूर्तावर मंगळवारी एकूण ९०२ सदनिकांच्या गृहनिर्माण योजनेचा प्रारंभ करण्यात येणार आहे. या गृहनिर्माण योजनेंतर्गत नवी मुंबईतील कळंबोली, खारघर व घणसोली या विकसित नोडमधील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाकरिता ३८ व सर्वसाधारण प्रवर्गाकरिता १७५ याप्रमाणे एकूण २१३ सदनिका तसेच सिडकोच्या खारघर येथील स्वप्नपूर्ती व वास्तूविहार-सेलिब्रेशन गृहसंकुलातील मिळून ६८९ अशा एकूण ९०२ सदनिकांच्या विक्रीकरिता गृहनिर्माण योजना जाहीर करण्यात येणार आहे.

सिडकोतर्फे सातत्याने विविध उत्पन्न गटांतील नागरिकांकरिता गृहनिर्माण योजना राबविण्यात येतात. या वर्षीच्या कृष्ण जन्माष्टमीच्या मुहूर्तावर जाहीर करण्यात येणाऱ्या गृहनिर्माण योजनेद्वारे नागरिकांना सर्व पायाभूत सोयीसुविधांनी परिपूर्ण असलेल्या नवी मुंबईमध्ये आपल्या हक्काच्या घराचे स्वप्न साकार करण्याची संधी मिळणार आहे. या गृहसंकुलांना रेल्वे, रस्ते, मेट्रोद्वारे कनेक्टिव्हिटी लाभली आहे. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळासह सिडकोचे अन्य महत्त्वाकांक्षी प्रकल्प या गृहसंकुलांपासून नजीकच्या अंतरावर आहेत.

@Cidco Ltd @cidco_Ltd @cidco_Ltd @CIDCO Ltd. cidco.maharashtra.gov.in




सकाळ

मुंबई, गुरुवार, २२ ऑगस्ट २०२४

# सिडकोच्या ९०२ घरांच्या योजनेचा २७ ऑगस्टपासून प्रारंभ

नवी मुंबई, ता. २१ (वार्ताहर) : सिडकोतर्फे कृष्ण जन्माष्टमीच्या मुहूर्तावर नवी मुंबईतील कळंबोली, खारघर व घणसोली या विकसित नोडमधील एकूण ९०२ सदनिकांच्या गृहनिर्माण योजनेचा प्रारंभ मंगळवारी (ता. २७) करण्यात येणार आहे. यामध्ये आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाकरिता ३८ व सर्वसाधारण गटासाठी १७५ असे एकूण २१३ सदनिका तसेच सिडकोच्या खारघर येथील स्वप्नपूर्ती व वास्तुविहार-सेलिब्रेशन गृहसंकुलांतील शिल्लक ६८९ सदनिकांचा या गृहनिर्माण योजनेत समावेश आहे.

सिडकोतर्फे सातत्याने विविध उत्पन्न गटांतील नागरिकांकरिता गृहनिर्माण योजना राबविण्यात येत असून या वर्षी कृष्ण जन्माष्टमीच्या मुहूर्तावर जाहीर करण्यात येणाऱ्या गृहनिर्माण योजनेद्वारे नागरिकांना पायाभूत सोयी-सुविधांनी परिपूर्ण असलेल्या नवी मुंबईमध्ये आपले हक्काच्या घराचे स्वप्न साकार करण्याची संधी मिळणार आहे.

CIDCO
WE MAKE CITIES

NEWS

लोकसत्ता
WWW.LOKSATTA.COM
★ मुंबई, गुरुवार, २२ ऑगस्ट २०२४

# गोकुळाष्टमीला सिडकोच्या ९०२ सदनिकांची सोडत

लोकसत्ता प्रतिनिधी

**पनवेल :** सिडको महामंडळ नवी मुंबईतील विविध रेल्वे स्थानकांलगत महागृहनिर्माणातून हजारो सदनिका बांधत असल्याने या घरांची सोडत सिडको कधी काढणार याकडे सर्वसामान्यांचे लक्ष लागले असताना सिडको मंडळाने मंगळवारी रात्री कळंबोली, खारघर आणि घणसोली येथे यापूर्वी बांधलेल्या गृहसंकुलामध्ये बांधून पूर्ण असलेल्या उपलब्ध ९०२ सदनिकांची गृहविक्रीची सोडत कृष्ण जन्माष्टमीच्या मुहूर्तावर ( २७ ऑगस्ट ) काढणार असल्याचे जाहीर केले.

या सोडतीमध्ये नवी मुंबईतील कळंबोली, खारघर व घणसोली या विकसित नोडमधील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाकरिता ३८ व सर्वसाधारण प्रवर्गाकरिता १७५ असे २१३ सदनिका आणि खारघर येथे सिडकोने बांधलेल्या स्वप्नपूर्ती व वास्तुविहार-सेलिब्रेशन गृहसंकुलांतील ६८९ सदनिकांच्या विक्रीकरिता सोडत होणार असल्याची माहिती सिडकोने दिली.

> नवी मुंबई परिसरातील कळंबोली, घणसोली, खारघर येथील घरांसाठीची सिडको महामंडळाची ही सोडत २७ ऑगस्ट रोजी काढण्यात येणार आहे .



नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचा पहिला टप्पा पुढील सात महिन्यांत सुरू होत असून नवी मुंबई मेट्रो, अटल सेतू महामार्ग हे सुरु झाल्याने सिडको परिसराला दळणवळणाची नवी गती मिळाली आहे. सर्वाधिक गतिमान शहर असणाऱ्या सिडको परिसरात स्वतःचे हक्काचे घर असावे यासाठी अनेक गुंतवणूकदार प्रयत्नशील असतात. सिडकोच्या या सोडतीमध्ये हेच भाग्यवान नशीब आजमावणार आहेत. खारघर येथील सदनिकांच्या सोडतीमध्ये टूबीएचके घर असल्याने सिडकोने ठरविलेल्या सरकारी दरात नागरिकांना हे घर मिळण्याची संधी असणार आहे.